# यशोगाथा

## लांडोर खोरी वन उद्यान

जळगाव वन विभाग अंतर्गत जळगाव शहराच्या मध्यभागी वसलेले लांडोरखोरी वन उद्यान हे नियत क्षेत्र मेहरून अंतर्गत कक्ष क्रमांक 406 मध्ये असून त्याचे एकूण क्षेत्र 62.12 हेक्टर इतके आहे. लांडोर खोरी वन उद्यान हे जैवविविधता संपन्न क्षेत्र असून त्यास जैव विविधता वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.



लांडोर खोरी वन उद्यानास सन 2023-24 या वर्षात साधारणपणे 70 हजार इतक्या पर्यटकांनी भेट दिलेली आहे. लांडोर खोरी येथे लांडोर खोरी येथे 200 इतके वार्षिक पास पर्यटकांना वाटप करण्यात आलेले होते. सदर कालावधीत साधारणपणे 50 शाळा व महाविद्यालय इ च्या विद्यार्थ्यांनी भेटी दिलेल्या आहेत.

लांडोर खोरी वन उद्यान येथे सन 2024 या वर्षात पर्यटकांच्या सोयी व विकासात्मक कामाच्या दृष्टिकोनातून विविध कामे करण्यात आलेली असून वन उद्यानास भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी विविध सोयी सुविधा तयार करण्यात आलेल्या आहेत. लांडोर खोरी वन उद्यानामध्ये प्राधान्याने नक्षत्रवन, राशीवन, औषधी वनस्पती वन, गुलाब वन असे अनेक विविध वनांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच पर्यटकांसाठी तलावाचे सौंदर्यीकरण, खुली व्यायाम शाळा, लहान मुलांची खेळणी, लॉन



तयार करणे, पर्यटकांसाठी स्वच्छतागृह,आकर्षक कमान,पॅगोडा,कृत्रिम धबधबा तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तसेच दररोज भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी वन सभागृहची निर्मिती इ सोयी सुविधांची निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच विविध वन्य प्राण्यांच्या प्रतिकृती लावण्यात आले असून विविध वन्यप्राणी व वनस्पतींबाबत माहिती देणारे माहिती फलक लावण्यात आलेले आहेत.



वर नमूद केलेल्या विकासात्मक कामांमुळे लांडोर खोरी वन उद्यानास भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये वाढ झाली असून सन 2024-25 या वर्षात साधारणपणे 1.5 लाख इतक्या पर्यटकांनी भेट दिलेली आहे. लांडोर खोरी येथे सरासरी 25 इतके मासिक पास व 250 इतके वार्षिक पास पर्यटकांना वाटप करण्यात आलेले आहेत. त्यातून 28,43,370 रु. एवढा महसूल प्राप्त झालेला आहे.



सदर ठिकाणी पर्यटकांसमवेत परिसरातील एकूण 119 विविध शाळा व महाविद्यालय यांच्या सहली देखील उद्यानास भेट देण्याकरिता आयोजित करण्यात आल्या होत्या. लांडोरखोरी वन उद्यानास भेट देण्याकरिता इतर जिल्हे व शहरांमधून पर्यटक येतात व तेथील निसर्गाचा व सुविधांचा लाभ घेतात.